**श्री. रामदास चव्हाण,** अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाज विकास अधिकारी
खात्याचे नांव व पत्ता :–समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे–५
दूरध्वनी क्रमांक :–२५५०१२८१
कार्यालयीन वेळ :– स.९.४५ ते सायंकाळी ६.१५
खात्याचा ई–मेल :– sdd@punecorporation.org
जावक क्रमांक :– सविवि/ 2504
दिनांक :– 20/11/2025.

अपील प्राधिकारी तथा मुख्य समाज विकास अधिकारी यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपील क्रमांक :- पुणे मनपा/अ.प्रा.तथा अपील प्राधिकारी/अपील क्र. ९ /२०२५

अपिलार्थी नांव व पत्ता :-
**श्री. राजेश गायकवाड**
रा. प्राची अपार्टमेंट, घोरपडी गाव, अनंत थेअटरमागे
पुणे

जन माहिती अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा :-
**श्री. असंग पाटील,**
उप समाज विकास अधिकारी,
समाज विकास विभाग,
पुणे महानगरपालिका.

श्री. राजेश गायकवाड व इतर तीन --- अपिलार्थी
विरुध्द
जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपील

अपिलकर्ता यांनी दिनांक ६/१०/२०२५रोजी जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज करुन मागणी केलेली माहिती

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व इतर पत्रव्यवहारासंबधीची माहिती :-

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करुन द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ८/९/२०२५ | ७/१०/२०२५ | ३/१०/२०२५ | - | - |

प्रथम अपील अर्ज दाखल करण्याचे कारण :- अर्जदाराचे दिनांक ८/९/२०२५ रोजीच्या अर्जाप्रमाणे त्यांना दिलेल्या माहितीनुसार समाधान न झाल्याने प्रथम अपील अर्ज दाखल करण्यात आला आहे.

| प्रथम अपील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपील दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपील सुनावणी सूचना पाठविल्याचा दिनांक |
| ६/११/२०२५ | ६/१०/२०२५ | होय | लागू नाही | ३०/१०/२०२५ |

<u>प्रथम अपील सुनावणी दिनांक व वेळ :-</u> दिनांक ०७/११/२०२५, सकाळी ११.३० वाजता.

<u>सुनावणीस अपिलकर्ता उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ०७/११/२०२५रोजीच्या सुनावणीस अपिलकर्ता हे स्वत: उपस्थित होते.

<u>सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित/अनुपस्थित :-</u> दिनांक ०७/११/२०२५रोजीच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

**जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील :-**

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जन माहिती अधिकायाने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| 1 | माननीय सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता पुणे यांनी त्यांच्या जा. क्र. ३१/से.सो./ शिफारस/ २१९८/ २०२२, दि. २८/९/२०२२ रोजीच्या पत्रावर आपल्या विभागाच्या वतीने काय काय कार्यवाही झालेली आहे याबाबत माहिती मिळावी | सदर विषयी समाज विकास विभागाकडून कार्यवाही करणेत आली नाही तथापि माननीय सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता पुणे यांनी त्यांच्या जा. क्र. ३१/से.सो./ शिफारस/ २२०४/ २०२२, दि. २९/९/२०२२ नुसार मा. महापालिका आयुक्त यांना कळविले असून त्यानुसार सर्व परिमंडळ कार्यालय व सर्व क्षेत्रिय कार्यालय यांना संबंधित शासन निर्णया अनुसरून कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे.(प्रत सोबत जोडली आहे.) |

"विवेचन"

सदर बाबत अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती वेळेत उपलब्ध करून न दिल्याने अपिलार्थी यांनी अपिल क्र. PUMCO/A/2025/60359 दि. ४/१०/२०२५ रोजी प्रथम अपिल दाखल केले आहे.

माहिती देणेची मुदत संपल्यानंतर दि. ७/१०/२०२५ रोजी ऑन लाईन माहिती अपलोड केली आहे.

कौशल्य विकास रोजगार व उद्योजक्ता पुणे यांनी त्यांच्या जा.क्र. ३१/से.सो.शिफारस/ २१९८ /२०२२ दि. २८/९/२०२२ रोजीच्या पत्रावर आपल्या विभागाच्या वतीने काय कार्यवाही झाली याबाबत माहिती मिळावी असे लेखी म्हणणे अपिलार्थी यांनी प्रथम अपिल सुनावणीच्या वेळी दि. ७/११/२०२५ रोजी दिले आहे.

"आदेश"

सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता पुणे यांचे जा.क्र.३१/से.सो.शिफारस/ २१९८ /२०२२ दि.२८/९/२०२२ रोजीच्या पत्रावर समाज विकास विभागा कडून कार्यवाही करणेत आली नाही व याबाबतची माहिती अर्जदारास देणेत आली आहे. या कारणास्तव सदरचे अपिल निरस्त करणेत येत आहे.

(रामदास चव्हाण)
अपील प्राधिकारी तथा
मुख्य समाजविकास अधिकारी
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

दिनांक :-
ठिकाण :- पुणे.
टीप :-

१) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,पुणे खंडपीठ,पुणे,नवीन प्रशासकीय इमारत,४ था मजला,पुणे-१ यांचेकडे द्वितीय अपील करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२) या आदेशाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत :-

१) जन माहिती अधिकारी तथा उप समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
३) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
४) श्री. राजेश गायकवाड, प्राची अपार्टमेंट, घोरपडी गाव, अनंत थेअटरमागे, पुणे

यांजकडे पुढील जरूर त्या कार्यवाहीसाठी व माहितीसाठी